# NIT DOCUMENT

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

यांना कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी
तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणे बाबतची निविदा.

सन २०२१ – २०२२
( एका वर्षा करीता )



Scanned by CamScanner

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणे बाबतची निविदा.

**सन २०२१ – २०२२**

**(एका वर्षा करीता)**

**अनुक्रमणिका**


| अ.नं. | तपशील | पान नंबर |
|---|---|---|
| १ | निविदा मागविण्याबाबतची नोटीस | १ |
| २ | निविदा धारकांची माहिती | २ ते ३ |
| ३ | निविदेच्या अटी शर्ती | ४ ते १० |
| ४ | मनुष्यबळ संख्येचा तपशिल | ११ |
| ५ | तांत्रिक निविदा संबंधित सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे | १२ ते १३ |
| ६ | निविदाधारकाने दयावयाचे हमीपत्र | १४ ते १६ |
| ७ | फायन्सीयल बिड (BOQ) | १७ |




Scanned by CamScanner

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

मु.पो.शिर्डी, ता.राहाता जिल्हा-अहमदनगर पिन- ४२३ १०९

फोन नं. (०२४२३) २५८५०० / २५८८१० फॅक्स :- २५८८७०

( Website - www.shrisaibabasansthan.org.in / www.sai.org.in )


## ई- निविदा सूचना

| अ.नं. | ई- निविदेचा तपशील | निविदा किंमत रुपये | बयाणा रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना कंत्राटी पध्दतीने अनुभवी सुरक्षा कर्मचारी, माजी सैनिक, सशस्त्र सुरक्षा कर्मचारी पुरविणेबाबत. | १५,०००/- अक्षरी रु. पंधरा हजार मात्र | ३,००,०००/- अक्षरी रुपये तीन लाख मात्र |

१) ई-निविदेबाबत अधिक माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
२) निविदेसंबंधी कागदपत्रे डाउनलोडींगसाठी दि. २४/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वा. पासुन उपलब्ध आहे.
३) प्री बीड मिटींग शक्यतो दि. ३०/०३/२०२१ रोजी सकाळी ११ वाजता श्री साईबाबा मंदिर परिसरातील साई सभागृह (लेंडीबाग) येथे होईल. काही कारणास्तव यातारखेत बदल झाल्यास नवीन तारीख वेबसाईटवर कळविण्यात येईल.
४) निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि.१५/०४/२०२१ सायं.०५.०० वा.पर्यंत आहे.
५) निविदेबाबतच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
६) तांत्रिक निविदा संबंधित सादर करावयाचे कागदपत्रांचा तपशिल निवीदेत दिलेला आहे. ती सर्व कागदपत्रे स्कॅन करुन ऑन लाईन अपलोड करावीत.
७) निविदा शुल्क व बयाना रक्कम शासनाच्या www.mahatenders.gov.in या पोर्टलवर जमा करण्यात यावी.
८) तांत्रिक निविदा दि.१६/०४/२०२१ रोजी उघडण्यात येतील.

कोणतीही अथवा सर्व ई-निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे. त्याबाबत कुठलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी



Scanned by CamScanner

**SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI**
E - TENDERING

## Tender details

| | |
|---|---|
| **Department Name :** | **SHRI. SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI / LABOUR DEPARTMENT.** |
| **Tender Reference Number:** | - |
| **Tender Type :** | Open Tender |
| **Form of Contract :** | percentage – Rate |
| **Tender category :** | Manpower Supply |
| **Offline Payment Instruments** | **Bank** 1) SBI 2) CBI |
| **Details of Cover** | |
| **Fee / Pre Qual / Technical** | As per Tender Documents Page No.12 To Page No.13. |
| **Finance** | As per Tender Document Page No.17. |
| **EMD Fee Details** | |
| **EMD Fee (INR) Rs.** | 3,00,000/- (Rs. Three Lacs only.) |
| **Fee payable To** | Chief Executive Officer |
| **Fee Payable at** | Shri Saibaba Sansthn Trust, Shirdi. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **Work Description** | | | | |
| **Tender Value (INR) Rs.** | | | 15,000/- | |
| **Bid Validity (Days)** | **90** | **Days** | period of Work (Days) | 365 |
| | | **Prouct Category** | - | |
| | | **Contract Type** | Supply of Security Gaurds & Security Personnels. | |

| | |
|---|---|
| **Critical Dates** | |
| **Tender Publish** | Date : 24/03/2021 Time – 11:00 AM / PM |
| **Document Download / Sale Start** | Date : 24/03/2021 Time – 11:00 AM / PM |
| **Document Download / Sales End** | Date : 15/04/2021 Time – 05:00 AM / PM |
| **Bid Submission Start** | Date : 24/03/2021 Time – 11:00 AM / PM |
| **Pre-Bid Meeting Date** | Date : 30/03/2021 Time – 11:00 AM / PM |
| **Technical Bid & Financial Bid Submission Last Date** | Date : 15/04/2021 Time – 05:00 AM / PM |
| **Technical Bid Opening Date** | Date : 16/04/2021 Time – 05:00 AM / PM |
| **Name Of Head Of Department** | N.B.Kote |
| **Name Of Administrative Officer For the Department** | B.B.Ghorpade |

**Signature and Name**
**Head of Department**
**Labour.**

19/3/2021

**Administrative Officer,**
**Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.**

**Draft submitted for Approval**



Scanned by CamScanner

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणे बाबतची निविदा.**

**( एका वर्षा करीता )**

## निविदाधारकाची माहिती

| अ.नं. | तपशील | इच्छुक निविदाधारकाने भरावयाची माहिती |
|---|---|---|
| ०१ | निविदाधारकाचे नांव | |
| ०२ | पत्रव्यवहाराचा पुर्ण पत्ता | |
| ०३ | दूरध्वनी क्रमांक | |
| ०४ | ऑफिस | |
| ०५ | फॅक्स नंबर | |
| ०६ | मोबाईल नंबर | |
| ०७ | ई.मेल | |
| ०८ | संपर्कासाठी प्रतिनीधीचे नांव | |
| ०९ | फोन नंबर / मोबाईल नंबर | |
| १० | मालकाचे / भागीदारांची नांवे | |
| ११ | ठेकेदारीचा नोंदणी क्र.<br>(शॉप ॲक्ट / कंपनी ॲक्ट प्रमाणे) | |
| १२ | औद्योगिक रजिस्ट्रेशन नंबर | |
| १३ | सध्याचे लेबर लायसेन्स नंबर | |
| १४ | प्रॉव्हींडंड फंड कोड अकांऊट नंबर | |
| १५ | ई.एस.आय.सी नंबर | |
| १६ | व्यवसाय कर नोंदणी नंबर | |
| १७ | सुरक्षा कर्मचाऱ्यांची एकुण संख्या | |



Scanned by CamScanner

| अ.नं. | तपशील | इच्छुक निविदाधारकाने भरावयाची माहिती |
|---|---|---|
| १८ | आयकर पॅन नंबर | |
| १९ | सेंट्रल GSTS रजिस्ट्रेशन नंबर | |
| २० | स्टेट GST रजिस्ट्रेशन नंबर | |
| २१ | बॅकेचे नाव, शाखा<br>बँक खाते नंबर | |
| २२ | आय.एफ.सी कोड | |
| २३ | प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सी लायसेन्स नंबर | |
| २४ | सुरक्षा गार्डबोर्ड एक्झमशन सर्टिफिकेट नंबर | |
| २५ | सन २०१९ - २०२० चे बॅलन्ससीट. | |
| २६ | आर्थिक वर्ष सन २०१७-१८,२०१८-१९ व २०१९-२० या वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल दर्शविणारे चार्टर्ड अकौंटंट यांचे प्रमाणपत्र | |

निविधाधारकाची स्वाक्षरी व शिक्का



Scanned by CamScanner

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

### संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेबाबत

### ई - निविदेच्या शर्ती व अटी

१) कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेबाबतची निविदा ऑनलाईन भरावयाची असून, **ऑन-लाईन भरलेल्या टेक्नीकल बीड व व्यावसायिक बीड (कमर्शियल बीड) हयाच ग्राहय धरण्यात येईल.**

२) निविदा ऑनलाईन भरावयाची असल्याने टेक्नीकल बीडची सर्व कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करावीत.

३) टेक्नीकल बीडचे प्रत्येक पानावर निविदाधारकाची स्वाक्षरी व फर्मचा शिक्का असावा.

४) **निविदा पुर्व अर्हताः-**

पुढील प्रमाणे अर्हता धारण करणा-या निविदा धारकांनाच प्रस्तुत निविदेसाठी पात्र समजण्यात येईल.

अ) मागील ३ वर्षात विविध आस्थापनांना सरासरी किमान ९०० सुरक्षा कर्मचारी पुरविण्याचा अनुभव असावा.

ब) मागील ३ वर्षात कोणतेही एका आस्थापनेला किमान ३०० सुरक्षा कर्मचारी पुरविणेचा कमीत कमी १ कार्यादेश असावा.

क) मागील ३ आर्थिक वर्ष सन २०१७-१८,२०१८-१९ व २०१९-२० या वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल किमान रु.१० कोटी इतकी असावी.

५) **निविदेचे मुल्यांकनः-**

**अ) तांत्रीक मुल्यांकन** – प्राप्त निविदा धारकांच्या पुढील गुणांकन पध्दतीप्रमाणे गुणांकन करण्यात येईल.

(०१) मागील ३ वर्षात सरासरी पुरविलेल्या सुरक्षा कामगारांची संख्याः-

| अ.नं. | सुरक्षा कर्मचारी संख्या | गुण ( मार्क्स) |
|---|---|---|
| १ | ९०० ते १००० | १० |
| २ | १००१ ते ११०० | २० |
| ३ | ११०१ ते १२०० | ३० |
| ४ | १२०० पेक्षा जास्त | ४० |

०२) ३०० किंवा त्यापेक्षा जास्त कर्मचारी एका आस्थापनेला पुरविलेल्या कार्यादेशांची संख्याः–

| अ.नं. | कार्यादेशांची संख्या | गुण ( मार्क्स) |
|---|---|---|
| १ | १ पेक्षा जास्त ३ पर्यंत | २० |
| २ | ३ पेक्षा अधिक | ३० |

०३) मागील ३ वर्षातील वार्षिक सरासरी उलाढालः-

| अ.नं. | वार्षिक उलाढाल | गुण ( मार्क्स) |
|---|---|---|
| १ | १० ते १२ कोटी | १० |
| २ | १२ ते १५ कोटी | २० |
| ३ | १५ पेक्षा जास्त | ३० |

**{ उपरोक्त गुणांकन पध्दतीप्रमाणे तांत्रिक निविदांच्या पडताळणीत किमान ७० गुण मिळालेल्या निविदा धारकांच्याच वाणिज्यीक निविदा उघडणेस पात्र असतील.}**



Scanned by CamScanner

**ब) वाणिज्यिक मुल्यांकनः-** तांत्रिक मुल्यांकनात किमान ७० गुण मिळालेल्या निविदाधारकांची वाणिज्यीक निविदा उघडण्यात येवून त्यामध्ये न्युनतम दरधारक निविदाधारकास यशस्वी निविदा धारक समजण्यात येईल.

६) सुरक्षा कर्मचारी पुरविणाऱ्या ठेकेदाराकडे प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सीज (रेग्युलेशन)ॲक्ट, २००५ व महाराष्ट्र प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सीज (रेग्युलेशन) रूल्स, २००७ चे तरतुदीस अनुसरून पोलीस कमिशनर ऑफिस व कंन्ट्रोलिंग ॲथॉरिटी यांचेकडील फॉर्म नं.VI मधील प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सी लायसेन्स असणे आवश्यक असून, ते त्यांचेवर नियमानुसार बंधनकारक आहे. तसेच सदर सुरक्षा एजन्सीकडे सुरक्षा गार्ड बोर्ड एक्झमशन सर्टिफिकेट खाली नमूद मुदतीमध्ये प्राप्त करणे आवश्यक आहे.

७) सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामाचा कार्यादेश मिळताच ९० दिवसांचे आत सुरक्षा गार्डबोर्ड एक्झमशन सर्टिफिकेट कामगार विभागात जमा करण्यात यावे, सर्टिफिकेट सादर न केल्यास मुदतीनंतर पहिल्या महिन्यासाठी प्रतिदिन रु.५००/- व त्यानंतर दुस-या महिन्यापासून प्रतिदिन रु.१,०००/- याप्रमाणे रक्कम मासिक बिलातून वसूल/कपात करण्यात येईल.

८) निविदांधारक / कंत्राटदार व त्यांचेमार्फत नेमू इच्छिणारे कंत्राटी सुरक्षा कर्मचारी हे भाविक प्रवृत्तीचे असले पाहीजेत. तसेच संस्थानमध्ये दर्शनासाठी येणा-या भाविकांशी नम्रतेने व तत्परतेने सेवा देणारे असावेत. भाविकांशी उध्दट, बेशिस्त वर्तन तसेच इतर गैरशिस्तवर्तन करणारे कंत्राटी सुरक्षा कर्मचारी यांना तात्काळ विनानोटीस व विना नुकसान भरपाई कामावरुन बंद करणेची जबाबदारी संबधीत कंत्राटदारावर राहील.

९) सुरक्षा कंत्राटदार व त्यांचेमार्फत नेमण्यात येणारे सुरक्षा कर्मचारी यांना मराठी बोलता आले पाहीजे. यासाठी सदर कंत्राटदार व त्यांच्यामार्फत नेमण्यात येणारे सुरक्षा रक्षक यांचा मागील कामाचा अनुभव, ज्या-ज्या ठिकाणी काम केले त्या त्या ठिकाणच्या कामाचा तपशिल दिला पाहीजे.

१०) कंत्राटदाराने त्यांचेमार्फत नेमलेल्या कंत्राटी सुरक्षा कामगारांवर नियंत्रण (कंन्ट्रोल) व देखरेख (सुपरविझन) ठेवणेची जबाबदारी संबंधीत कंत्राटदारावर राहील. कंत्राटदार अथवा त्याने पुरविलेले कंत्राटी सुरक्षा कर्मचारी व संस्थान यांचेमध्ये मालक व नोकर असा कोणताही संबंध राहणार नाही अथवा प्रस्थापित होणार नाही.त्याबाबत काही विवाद निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी निविदाधारकाची/ठेकेदाराची राहील.

११) कंत्राटदार अथवा त्याने पुरविलेले कंत्राटी सुरक्षा कर्मचारी यांनी संस्थानच्या आवारात कोणतेही स्वरुपाचे गैरवर्तन केले अथवा शिस्तीस बाधा येईल असे कोणतेही वर्तन केल्यास, असे गैरवर्तन केलेले सुरक्षा कर्मचारी कंत्राटदाराने संस्थानला पुरवू नये.तसेच असे प्रकार वारंवार घडल्यास विना नुकसान भरपाई व विना नोटीस संबंधीत सिक्युरिटी एजन्सीचे **कंत्राट रद्द करण्याचा हक्क संस्थान प्रशासन राखून ठेवत आहे.**

१२) कंत्राटदारामार्फत पुरविलेले कंत्राटी सुरक्षा कर्मचा-यांनी कोणतेही गैरकृत्य केल्यास किंवा संस्थानचे मिळकतीस इजा/हानी पोहोचविल्यास त्याबाबतची संपूर्ण नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदार यांचेवर राहील.

१३) ज्या परीसर/विभागाची संरक्षणाची जबाबदारी कंत्राटदार व त्याने पुरविलेल्या सुरक्षा कर्मचा-यावर सोपवलेली असेल त्या विभागात अगर परीसरात चोरी झाल्यास, मारामारी झाल्यास अथवा कोणतेही बेशिस्त व अनुचित वर्तन झाल्यास अगर संस्थान मालमत्तेची हानी व नुकसान झाल्यास त्यासाठी कंत्राटदार नुकसान भरपाईसाठी अगर इतर कायदेशीर बाबींसाठी जबाबदार राहील. चोरी किंवा नुकसान झाल्यास तेवढी रक्कम एजन्सीचे बिलातून वसूल केली जाईल.

१४)संस्थान मालमत्तेचे संरक्षणाव्यतिरिक्त, संस्थान परिसरात अनाधिकृत खाजगी विक्रेत्यांना येण्यापासून व साहित्य विक्री करण्यापासून प्रतिबंध करणे, हॉटेल्स एजंन्ट, ट्रॅव्हलींग एजंन्ट्स, फुल दुकानदारांचे एजंन्ट्स, लॉटरी तिकीट विक्रेते, पेपर विक्रेते, भिकारी यांना संस्थान परिसरात येणेस मज्जाव/प्रतिबंध करणे तसेच अनाधिकृत पार्किंगवर प्रतिबंध घालणे व इतर तत्सम दक्षता संबंधीत सुरक्षा एजन्सीला व त्यांचे सुरक्षा कर्मचाऱ्यांना घ्यावी लागेल.



Scanned by CamScanner

१५) कंत्राटदाराकडून संस्थानला पुरविण्यात येणारे कंत्राटी सुरक्षा कर्मचारी यांची निवासव्यवस्था संबधीत कंत्राटदारास स्वत: करावी लागेल. **कंत्राटी सुरक्षा कामगारांची निवासव्यवस्थाकरणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.** तथापि, उपलब्धतेनुसार एकत्रित निवासासाठी संस्थाननियमानुसार कॉमनहॉल देणेबाबत संस्थानकडुन विचार करणेत येईल.

१६) संस्थानला आवश्यकतेप्रमाणे व गरजेप्रमाणे पुरेशे संख्येने सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणे संबंधीत निविदाधारकावर बंधनकारक आहे.व्यवस्थापनाच्या आवश्यकतेनुसार श्री रामनवमी, गुरुपौर्णिमा, पुण्यतिथी उत्सव व सलग सुट्टयांचे कालावधीत तात्पुरते जादा कंत्राटी सुरक्षा कर्मचारी यांची मागणी केल्यास ते पुरविणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. निविदाधारकाने वर्क ऑर्डरप्रमाणे व आवश्यकतेप्रमाणे संस्थानला कंत्राटी सुरक्षा कर्मचारी पुरेसे संख्येने न पुरविल्यास, त्याप्रमाणात प्रतिदिनी प्रति कर्मचारी रूपये ५००/- प्रमाणे दंड कंत्राटी कामाचे बिलातुन वसुल/कपात करणेत येईल.

१७) कंत्राटदाराने निविदा मंजूर झाल्यानंतर करारनामा करतेवेळी त्यांचेमार्फत पुरविलेल्या सुरक्षा कर्मचा-यांची संपूर्ण नांवे, पत्ते व त्यांचे जन्मतारीख दाखले, दोन पासपोर्ट साईज फोटो संस्थानला देणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील, तसेच सर्व सुरक्षा कर्मचाऱ्यांची आवश्यकतेनुसार चारित्र्य पडताळणी करून, पोलीस तपासणी अहवाल (Police Verification Report) कार्यादेश दिले पासून ४५ दिवसांचे आत देणे संबंधीत कंत्राटदारावर बंधनकारक आहे.सर्व कंत्राटी सुरक्षा कामगारांचा पोलीस तपासणी अहवाल संस्थानला सादर न केल्यास प्रतिदिनी रूपये ५००/- दंड ठेकेदाराचे मासिक बिलातुन कपात/वसुल करणेत येईल.

१८) सुरक्षा रक्षकांस वर्तणुक फायर फायटींग, प्रथमोपचार व जमावावर नियंत्रण ठेवणेचे प्रशिक्षण दिलेले असणे आवश्यक आहे.कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेपुर्वी संबंधीत सुरक्षा एजन्सीने त्यांना प्रशिक्षण (Training) देणे आवश्यक असुन ते त्यांचेवर बंधनकारक आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण (Training) दिलेबाबत लेखी अहवाल २ महिन्यांचे आत संस्थानला सादर करणेत यावा.

१९) कंत्राटदाराकडून संस्थानला पुरविण्यात येणारे कंत्राटी सुरक्षा कर्मचारी यांना युनिफॉर्म,ओळखपत्र, डयुटी कार्ड कार्यारंभ आदेश मिळालेपासून १५ दिवसांचे आत पुरविणेची जबाबदारी संबधीत कंत्राटदारावर राहील व त्याकामी येणारा खर्च कंत्राटदारास स्वत:करावा लागेल. तसे न केल्यास प्रतिदिनी रूपये १०००/- दंड ठेकेदाराचे मासिक बिलातुन कपात/वसुल करणेत येईल.

२०) कंत्राटदाराकडून संस्थानला पुरविण्यात येणारे कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांकडुन युनिफॉर्म, ओळखपत्र, ड्यूटी कार्डबाबत रक्कम कंत्राटदारास वसुल/कपात करता येणार नाही.

२१) कंत्राटदार व त्यांचेमार्फत पुरविण्यात येणारे कंत्राटी सुरक्षा कर्मचारी यांच्यात काही विवाद अथवा तंटा उपस्थित झाल्यास तो सोडविण्याची पुर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील. त्याची तोषीस अथवा झळ संस्थानला लागणार नाही याची खबरदारी घेणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

२२) पोलीस कॉन्स्टेबल या पदासाठी शासनाने विहीत केलेली शैक्षणिक पात्रता व शारीरीक क्षमता पुर्ण करणा-या व्यक्तींनाच संस्थानमधील सुरक्षा कामासाठी कंत्राटी सुरक्षा कर्मचारी म्हणून नेमणे संबंधीत कंत्राटदारावर बंधनकारक राहील. कंत्राटी सुरक्षा कर्मचारी हे आवश्यक त्या शैक्षणिक पात्रतेसह इतर कामाचा अनुभव व शारीरीक दृष्टया सक्षम असावेत. कंत्राटी सुरक्षा कर्मचारी कामास पुरवितांना स्थानिक व सध्या कार्यरत असलेल्या पात्र सुरक्षा कर्मचा-यांना प्राधान्य देण्यात यावे.



Scanned by CamScanner

२३) मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निश्चीत केलेल्या वेतन व इतर दरामध्ये कोणत्याही सबबीवर कंत्राटदारास अथवा त्याने पुरविलेल्या कंत्राटी सुरक्षा कर्मचा-यास दरवाढ मागता येणार नाही. सदर दरामध्ये वाढ करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.वेतनदराबाबत अथवा इतर कायदेशीर देणी देणेबाबत काही विवाद उपस्थित झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत निविदाधारक / ठेकेदारावर राहील.

२४) निविदाधारकाने नियुक्त केलेल्या सुरक्षा कर्मचा-यास कामगार नुकसान भरपाई (वर्कमन कॉम्पेनसेशन अ‍ॅक्ट, १९२३) कायद्यानुसार नुकसान भरपाई द्यावयाची झाल्यास त्याबाबत संपूर्ण जबाबदारी निविदाधारकांवर राहील. त्याचप्रमाणे वर्कमेन कॉम्पेनसेशन अ‍ॅक्टचे तरतुदीस अनुसरून कंत्राटी कामगारांची विमा पॉलीसी कार्यारंभ आदेश मिळताच तात्काळ घेणे व सदर विमा पॉलीसीची प्रमाणीत प्रत संस्थानकडे दाखल करणे संबंधीत एजन्सीवर बंधनकारक राहील. दरम्यानचे काळात सुरक्षा कर्मचारी यांचे संदर्भात काही दुर्घटना झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी किंवा नुकसान भरपाईची जबाबदारी संबंधित एजन्सीची राहिल.

२५) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५.०२.२०१७, निर्णय क्र.१४१ अन्वये सर्व कंत्राटी कर्मचा-यांचा रु.१० लाख अपघात विमा पॉलीसी कार्यारंभ आदेश मिळताच तात्काळ घेणे व सदर विमा पॉलीसीची प्रमाणीत प्रत संस्थानकडे दाखल करणे संबंधीत एजन्सीवर बंधनकारक राहील. त्याबाबत संपूर्ण जबाबदारी निविदाधारकांवर राहील.

२६) एम्प्लॉईज प्रॉव्हीडंट फंड अ‍ॅन्ड मिसलिनियस प्रोव्हीजन अ‍ॅक्ट, १९५२ नुसार कंत्राटदाराकडे भविष्यनिर्वाह निधीचा महाराष्ट्रातील रिजनल प्रॉव्हीडंट फंड कमिशनर ऑफिस, अथवा नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील स्वतंत्र प्रॉव्हीडंट फंड कोड नंबर असणे आवश्यक आहे. भविष्य निर्वाहनिधीचा स्वतंत्र कोड नंबर संबंधीत अ‍ॅथॉरिटीकडून घेणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. भविष्य निर्वाह निधीचा स्वतंत्र कोड नंबर नसलेल्या ठेकेदाराची/कंत्राटदाराची निविदा विचारात घेतली जाणार नाही. निविदेसोबत प्रॉ.फंड कोड ड्राफ्ट नंबरची प्रत सादर करणेत यावी.

२७) कंत्राटी कर्मचारी हिस्सा प्रॉव्हींडंड फंड १२ % व मालकाचा हिस्सा १३ % अशा एकूण २५ % प्रा.फंडांच्या रकमेचा (प्रशासकीय चार्जेससह) भरणा ठेकेदाराने स्वतः करावायाचा आहे. व त्याबाबतची चलने व इतर अनुषंगिक कागदपत्रे संस्थानच्या प्रशासन शाखा वशी १० अ यांचेकडे विहित मुदतीत जमा करावयाची आहे. त्यानंतरच सदर १३% मालकाचा हिस्सा ठेकेदारास / मासिक बिलामध्ये संस्थानकडून अदा करण्यात येईल.कंत्राटी कर्मचाऱ्यांचे प्रॉव्हीडंड फंड रक्कमेचा भरणा विहीत मुदतीत करणे व प्रॉव्हीडंड फंड चलने व अनुषंगीक कागदपत्रे विहीत मुदतीत सादर करणे हे तुमचेवर नियमानुसार बंधनकारक राहील. त्याची तोषीस/झळ संस्थानला लागणार नाही याची दक्षता घ्यावी. विलंबाबाबत दंडात्मक अथवा इतर कारवाई झाल्यास त्याची जबाबदारी तुमचेवर राहील.

२८) मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३ चे कलम ६ (ब) (ब) नुसार प्रत्येक कॅलेंडर वर्षाचे माहे जून व माहे डिसेंबर या महिन्याचे कंत्राटी सुरक्षा कर्मचारी यांचे पगार पत्रकातुन सर्व कंत्राटी कर्मचारी यांची नियमानुसार विहित दराने वेलफेअर फंडाची वर्गणी (कर्मचारी हिस्सा) कपात करुन, तसेच मालकाच्या हिश्श्याची वेलफेअर फंडाची वर्गणी कंत्राटदाराने स्वत: जमा करावयाची आहे व असे कर्मचारी तसेच मालक वर्गणीच्या एकत्रीत रक्कमेचा भरणा प्रत्येक कॅलेंडर वर्षाचे १५ जुलै व १५ जानेवारी पुर्वी चेक/डिमांड ड्राफ्टद्वारे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, हुतात्मा बाबु गेणू मुंबई गिरणी कामगार क्रिडा भवन, सेनापती बापट मार्ग,एलफिन्स्टन, मुंबई- ४०० ०१३ यांचेकडे विहित विवरण पत्रासोबत कंत्राटदाराने करावयाचा आहे. सदर कामगार कल्याण निधी भरणा करणेची कायदेशीर जबाबदारी कंत्राटदार यांची राहील. कामगार कल्याणनिधी वर्गणी संदर्भात कुठलीही रक्कम कंत्राटदारास संस्थानकडुन दिली जाणार नाही.

२९) कंत्राटदाराने कामाचा महिना पूर्ण झालेनंतर पुढील महीन्याच्या तीन तारखेपर्यंत त्यांचे कामाचे बिल हजेरीपटासह संस्थानचे संबधीत अधिक्षक/खातेप्रमुख यांचे सुस्पष्ट लेखी अभिप्रायासह / शे-यासह कामगार विभागाकडुन तपासुन/ पडताळणी करून मुख्यलेखाधिकारी यांचेकडे दाखल करणे आवश्यक आहे.



Scanned by CamScanner

३०) लेखाशाखेकडुन सदर बिलाची रितसर तपासणी / पडताळणी केल्यानंतर बिलाची मंजूर रक्कम कंत्राटदारास आदा केली जाईल.

३१) कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी सुरक्षा कर्मचारी यांचे वेतन महिना पुर्ण झालेनंतर पुढील महिन्याचे १० तारखेचे आंत बँक खात्यावर संबंधितांना अदा करणे व संबंधितांचे बँक खात्यावर अदा केलल्या रक्कमेबाबत बँक यादी संस्थानला देणे कंत्राटदारावर नियमाप्रमाणे बंधनकारक राहील. संस्थानकडुन काही कारणास्तव बिलाची रक्कम ठेकेदारास अदा करणेस विलंब झाल्यासही देखील कंत्राटदाराने कंत्राटी सुरक्षा कर्मचारी यांचे वेतन वाटप स्व:भांडवलातून विहीत मुदतीत म्हणजे महिना पुर्ण झालेनंतर पुढील महिन्याचे १० तारखेपर्यंत न केल्यास, ११ तारखेपासून ते वेतन वाटप होईपर्यंत प्रत्येक दिवसास रूपये ५,०००/- याप्रमाणे दंड कंत्राटदाराचे मासीक बिलातुन वसुल/कपात करणेत येईल.

३२) कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी सुरक्षा कामगारांचे हजेरीपत्रक, पगारपत्रक व इतर आवश्यक ते रेकार्ड कॉन्ट्रक्ट लेबर ॲक्टप्रमाणे ठेकेदारास विहीत नमुन्यात ठेवावे लागेल.ते कंत्राटदारावर बंधनकारक राहील. कंत्राटी सुरक्षा कामगारांचे वेतनाबाबत काही विवाद उपस्थित झाल्यास त्याची संपूर्ण कायदेशीर जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

३३) अ) कंत्राटदाराने पुरविलेल्या कंत्राटी सुरक्षा कामगारांचे, कामगार कल्याण निधी, व्यावसायकर, आयकर, टी.डी.एस., इन्क्रीमेंट, वर्कमेन कॉम्पेनसेशन, घरभाडे भत्ता, पगारी सुट्टया, पगारी रजा, ई.एस.आय.सी. कॉन्ट्रीब्युशन, उपदान (ग्रॅच्युटी) ,जी.एस.टी. सह देयक सादर करणे व इतर आर्थिक बाबी इ.संबंधीची सर्व कायदेशीर जबाबदारी औद्योगिक व कामगार कायदयाचे तरतुदीनुसार कंत्राटदारावर राहील. संस्थान त्यासाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार रहाणार नाही अथवा त्याची तोषीस व झळ संस्थानला लागणार नाही हे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

ब) वरील सर्व कायदेशीर जबाबदारी गृहीत धरुन, कंत्राटदाराने व्यवसायिक निविदेमध्ये ( Financial Bid ) मध्ये सेवा दर (Service Charges) संस्थानकडून देण्यात येणा-या वेतन दरावर नमूद करावयाचे आहे.

क) कंत्राटदारामार्फत संस्थानला पुरविणेत येणाऱ्या सिव्हीलियन सुरक्षा रक्षक या कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार महाराष्ट्र शासनाचे शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.०३ (मुंबई, हैद्राबाद, चेन्नई, बैंगलोर कार्यालयासाठी झोन नं.०१) प्रमाणे अनुज्ञेय असणारे किमान वेतनदर, माजी सैनिक सुरक्षा कर्मचाऱ्यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा / वाटाघाटीत ठरलेप्रमाणे सध्या देय्य असलेले वेतनदर (महाराष्ट्र शासनाकडुन वेळोवेळी देय्य होणारे स्पेशल अलौंन्ससह) अधिक प्रॉव्हीडंट फंड प्रशासकीय चार्जेससह (मालकाचा हिस्सा- १३.००%) अधिक कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्याचे वेतनदराचे रक्कमेवर सर्व्हिस चार्जेस रक्कम अधिक संपूर्ण बिलाचे रक्कमेवर अनुज्ञेय GST अधिक सानुग्रह अनुदान- ८.३३ % (प्रत्येक वर्षी दिपावली सणाचे वेळी), अधिक कामगार नुकसान भरपाई अधिनियम अंतर्गत ग्रुप इन्शुरंन्स प्रिमियम (अंशदान) याप्रमाणे रक्कम संबंधीत ठेकेदारास संस्थानकडुन देणेत येईल. याव्यतिरिक्त कोणतीही रक्कम संस्थानकडुन ठेकेदारास आदा केली जाणार नाही व तशी रक्कम मागणी करणेचा ठेकेदारास अधिकार राहणार नाही. इतर सर्व प्रकारची आर्थिक देणी देणेची जबाबदारी सबंधीत ठेकेदारावर राहील.त्याबाबत ठेकेदाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

३४) कंत्राटदाराकडून संस्थानला पुरविण्यात येणा-या कंत्राटी सुरक्षा कर्मचारी सबंधी कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम १९७० व महाराष्ट्र कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) नियम १९७१, पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट १९३६, किमान वेतन अधिनियम १९४८, व इतर सर्व औद्योगिक तसेच कामगार कायदयांच्या तरतुदींचे पालन करण्याची व त्यानुसार विहीत नमुन्यात कायदेशीर दृष्टया आवश्यक ते सर्व अभिलेखे, दस्तऐवज ठेवण्याची व संबधीत ॲथॉरिटीला विवरण पत्रे पाठविण्याची, त्याबाबत वेळोवेळी कायदेशीर पुर्तता करण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.



Scanned by CamScanner

३५) कंत्राटदाराकडून संस्थानला पुरविण्यात येणा-या कंत्राटी सुरक्षा कर्मचारी यांचे संदर्भात ठेवावयाचे सर्व प्रकारचे अभिलेखे, दस्तऐवज उदा.कंत्राटी कामगारांची प्रत्येक महिन्यांची बिले, हजेरी रजिस्टर, पगारपत्रके, यादया, विवरणपत्रे, प्रॉव्हीडंड फंड, सर्व्हिस टॅक्स, कामगार कल्याण निधी इत्यादि संदर्भातील सर्व कागदपत्रे व दस्तऐवज विहीत नमुन्यात कायदेशीर दृष्टया अचुक व परिपुर्ण ठेवण्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदारावर राहील.

३६) कंत्राटदाराकडून संस्थानला पुरविण्यात येणारे सुरक्षा कामगारांचे दैनंदिन आगमन व निर्गमनावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वखर्चाने स्वतंत्र बायोमेट्रीक्स अॅटेंडन्स सिस्टीम बसविणे बंधनकारक राहील. तसेच संबधीत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे पगारपत्रक सादर करतांना उशीरा येणाऱ्या अथवा फिंगर प्रिंन्टीग पंचीग न करण्याऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यावर कारवाई करुन त्यानुसार पगारबील सादर करावे लागेल. तसेच संबधीत कंत्राटी कर्मचाऱ्यांना दरमहा पेमेंट स्लिप द्यावी लागेल. हे संबधीत कंत्राटदारकावर बंधनकारक राहील.

३७) संबंधित कामाची निविदा फी रु.१५,००० (अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र) व बयाणा रक्कम म्हणून रु.३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख मात्र) www.mahatenders.gov.in या ऑनलाईन टेंडर पोर्टल वरील मार्गदर्शक सुचनांप्रमाणे भरावी लागेल. निविदा धारकाने विहीत मुदतीत करारनामा करुन न दिल्यास बयाणा रक्कम जप्त करणेत येईल.

३८) निविदा मंजूर झाल्यानंतर करारनामा करतेवेळी निविदाधारकास कामाची हमी म्हणून एकूण अंदाजित वार्षिक बिलाच्या रक्कमेच्या ३% सुरक्षा अनामत रक्कम रु.५५,२५,०००/-(अक्षरी रुपये पंचावन्न लाख पंचवीस हजार मात्र) त्वरीत बँकेचे RTGS / NEFT व्दारे अथवा डिमांड ड्राफ्टने संस्थानकडे ०५ दिवसांचे आतं बिनव्याजी जमा करावी लागेल. कंत्राटपूर्ण झालेनंतर सदर रक्कम कंत्राटदारास बिनव्याजी परत करणेत येईल. सन २०२० - २०२१ चे सदर कामाचे वार्षिक बील रु.१८,४१,००,०००/- इतके होते.

३९) निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून कार्यादेश मिळालेपासून दहा दिवसांचे आंत सदर कंत्राटदाराने रितसर लेखी करारनामा रु.६००/- चे स्टॅम्प पेपरवर करुन देणे त्यांचेवर बंधनकारक राहील व कायद्यानुसार आवश्यक असलेले रजिस्ट्रेशन, प्रॉव्हीडंट फंड नंबर, लेबर लायसेन्स, प्रायव्हेट सिक्युरिटी लायसेन्स, सिक्युरिटी डिपॉझिट इत्यादी सर्व बाबींची कायदेशीर पुर्तता कंत्राटदारास पंधरा दिवसात करावी लागेल. सदर पुर्तता विहीत मुदतीत न केल्यास त्या पुढील तारखेपासून प्रतिदिनी रु.१,०००/- मात्र दंडाची रक्कम ठेकेदाराचे मासीक बिलातुन कपात / वसुल करणेत येईल.

४०) या निविदेतील अटी व शर्ती, मा.व्यवस्थापन समिती ठराव, कार्यादेश इत्यादी करारनाम्याचा एक भाग समजला जाईल.

४१) निविदा मंजूर झाल्यानंतर कंत्राटदारास त्यांचेकडील सर्व कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांची पोलीस विभागाकडून चारित्र्य पडताळणी (पोलीस व्हेरीफिकेशन) करुन, चारित्र्य पडताळणी अहवाल दोन महिन्यांचे आंत संस्थानला सादर करावा लागेल, ते संबंधीत ठेकेदारावर बंधनकारक राहील. त्यांचेकडील सर्व कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांचा चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त न झाल्यास सर्व कर्मचाऱ्यांची पडताळणी होईपर्यंत प्रतिमहा रु.५,०००/- याप्रमाणे दंड कंत्राटदाराचे मासीक बिलातुन वसुल/कपात करणेत येईल. किंवा कंत्राट मुदतपुर्व विना नोटीस व विना नुकसान भरपाई कंत्राट रद्द करण्याचा हक्क संस्थानने राखून ठेवला आहे.

४२) संस्थानला सदर कंत्राटदाराची आवश्यकता न वाटल्यास अथवा कंत्राटदाराचे काम समाधानकारक न वाटल्यास सदरचा करार अथवा कंत्राट मुदतपुर्व विना नोटीस व विना नुकसान भरपाई रद्द करण्याचा हक्क संस्थानने राखून ठेवला आहे.



Scanned by CamScanner

४३) निविदेतील कोणत्याही अटी व शर्तींचा भंग झाल्यास अथवा कंत्राटदाराने काम करण्याचे नाकारल्यास कंत्राटदाराची बयाणा रक्कम तसेच अनामत रक्कम जप्त करणेत येईल व कंत्राट विनानोटीस किंवा विना नुकसान भरपाई रद्द करणेत येईल. त्याबाबत निविदाधारकाची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

४४) परिशिष्ठ - २ मध्ये नमूद केलेप्रमाणे तांत्रिक कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावेत.

४५) सदरचे कंत्राट हे कार्यारंभ दिल्यापासून १२ महीने (एक वर्षे) कालावधीसाठी वैध राहील व तदनंतर संस्थानच्या आवश्यकते व गरजेनुसार आहे त्याच अटी,शर्ती तसेच दरपत्रकास अनुसरुन सदर कराराची/कॉन्ट्रॅक्टची मुदत पुढे वाढविली जाईल. तसे कंत्राटदारास लेखी पत्रान्वये कळविणेत येईल. अथवा सदर करारनामा/कॉन्ट्रॅक्ट मुदत संपताच आपोआप संपुष्टात येईल.

४६) भविष्याची तरतूद म्हणून ई-निविदेमध्ये पुरविणेत येणा-या कामगारांचे संख्येत वाढ किंवा घट करण्याचा संस्थानचा अधिकार राहील व त्यानुसार ठेकेदाराला कामगार पुरवावे लागतील. पुरविलेल्या कामगारांचे मासीक बिलानुसार सेवाआकार देण्यात येईल.

४७ कोणतीही निविदा निविदाप्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर स्विकारणेचा अगर नाकारणेचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दल कारण देणे संस्थान व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.

४८) निविदाधारकाने ई-निविदा भरतांना काही माहिती अपूर्ण ठेवल्यास /राहील्यास त्या निविदा कोणतेही कारण न देता रद्द अथवा अपात्र समजण्यात येतील. त्याबाबतचा अंतिम निर्णय हा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी राखुन ठेवला आहे.

४९) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे सदर निविदेत दोनपेक्षा जास्त न्युन्नतम दर धारक L-1 आल्यास ज्या निविदाधारकाचे तांत्रिक मुल्यांकनात सर्वाधिक गुण असेल अशा निविदाधारकास कार्यादेश देण्यात येईल. तांत्रीक मुल्याकनात सारखे गुण असल्यास मागील ०३ वर्षाची सरासरी, वार्षिक उलाढाल व कामाचा अनुभव हे निकष विचारात घेऊन जास्तीची उलाढाल व अनुभव असलेल्या निविदाधारकांचा विचार करता येईल, किंवा न्युन्नतम निविदाधारकांमध्ये काम विभागून देणेबाबतची व्यवहार्यता तपासून त्यानुसार निर्णय घेणेबाबतचा अधिकार संस्थानला राहील.

५०) ऑनलाईन निविदा सादर करतांना व्यवसायिक निविदेमध्ये ( **Financial Bid** ) तक्त्यामध्ये वेतनदर , प्राव्हीडंन्ड फंड, सानुग्रह अनुदान,सेवा कर अथवा जी. एस. टी. व तसेच गृप इन्सुरन्स इत्यादी बाबी वगळून निवीदा फॉर्ममधील अटी शर्तीचे अ.नं.३३ (अ) मध्ये नमुद केलेल्या कंत्राटदारावरील सर्व कायदेशीर आर्थिक देणी (बाबी) व जबाबदाऱ्या विचारात घेऊन, निविदाधारकांनी फायनन्सशियल बीडमध्ये सर्व्हिस चार्जेसची टक्केवारी नमूद करावी. **ऑनलाईन भरलेली व्यावसायिक बीडच (कमर्शियल बीड) ग्राहय धरण्यात येईल.**

५१) निविदेत नमूद केलेले काम गुणवत्तेच्या आधारावर देण्यात येणार आहे. त्यासाठी निविदाधारकांनी पा.नं. ०२,०३,१२ व १३ मध्ये दर्शविलेली कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

५२) या कॉन्ट्रॅक्टबाबत काही वाद अथवा तंटा उत्पन्न झाल्यास तो मा.सिव्हील जज्ज ज्युनियर डिव्हीजन, राहाता, मा.सिव्हील जज्ज सिनियर डिव्हीजन, कोपरगाव / मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद कोर्टाचे न्याय कक्षेत राहील.

५३) निविदेमधील अटी शर्तीचा व कागदपत्रांचा अभ्यास करुन निविदा सादर करावी व निविदेचा भाग म्हणून निविदेतील प्रत्येक पानांवर नमुद केलेल्या अटीशर्ती मान्य असलेबाबत प्रत्येक पान सहीशिक्यानिशी साक्षांकींत करुन अपलोड करणेत यावे.

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**



Scanned by CamScanner

# परिशिष्ट - १

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जिल्हा - अहमदनगर पिन- ४२३ १०९.

### मनुष्यबळ संख्या तपशिल

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेबाबत सर्व साधारण माहिती खालीलप्रमाणे आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविण्यासाठी अनुभवी, नोंदणीकृत व परवानाधारक कंत्राटदारांकडून ई - निविदेव्दारे निविदा मागविण्यात येत आहेत. संस्थानला दैनंदिन कामासाठी कंत्राटीपध्दतीने खालीलप्रमाणे सुरक्षा कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारांमार्फत आवश्यकतेप्रमाणे पुरवावयाचे आहेत.

**अ) कंत्राटी कुशल सुरक्षा कर्मचारी- ६५**

१) सुरक्षा अधिकारी (माजी सैनिक) - ०५     २) सुरक्षा सुपरवायझर- (माजी सैनिक) – २१

३) सशस्त्र सुरक्षा रक्षक (माजी सैनिक) - ३८     ४) व्यायाम शाळा प्रशिक्षक – ०१

**ब) कंत्राटी अकुशल सुरक्षा कर्मचारी- ६२९**

१)माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी – ४८     २) सुरक्षा रक्षक – (पुरुष / स्त्री) – ५८१

**इ) एकूण सुरक्षा कर्मचारी अंदाजे = अ - ६५ + ब – ६२९ = ६९४**

१) आवश्यकतेनुसार उपरोक्त संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे. त्याप्रमाणे कंत्राटदारास कंत्राटी सुरक्षा कर्मचारी माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरवावे लागतील.

२) ई - निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख / /२०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील. त्यानंतर आलेली ई- निविदा स्वीकारली जाणार नाही.

३) अपूर्ण अथवा बयाणा रक्कम नसलेली, तसेच आवश्यक कागदपत्रे सादर न केलेली निविदा विचारात घेतली जाणार नाही.

४) मुदतीनंतर आलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाही.

५) उपरोक्त अटी शर्तींमध्ये अंशतः किंवा पुर्णतः बदल करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखुन ठेवला आहे.

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**



Scanned by CamScanner

## परिशिष्ट - २

**तांत्रिक निविदा (Technical Bid) आवश्यक कागदपत्रे.**

**१) खालील तपशीलाप्रमाणे तांत्रिक कागदपत्राची (Technical Bid) ऑनलाईन स्कॅन करणेत यावी. त्याशिवाय निविदेचा विचार केला जाणार नाही.**

### अ) कागदपत्रे

१. मागील तीन वर्षातील वर्कऑर्डर (कर्मचारी संख्या नमूद असावी) व सहाय्यक कामगार आयुक्त यांचेकडील लेबर लायसेन्सच्या वर्षनिहाय प्रती

२. मागील ३ वर्षात विविध आस्थापनांना आस्थापना निहाय पुरविणेत आलेल्या कंत्राटी सुरक्षा कर्मचारी यांची संख्या दर्शविणारा स्वसाक्षांकित तक्ता:-

**अ)आर्थिक वर्ष २०१७-१८ (दि.०१ एप्रिल २०१७ ते दि.३१ मार्च २०१८)**

| अ.नं. | ज्या आस्थापनेला कामगार पुरविण्यात आले त्या आस्थापनेचे नाव | आदेश क्रमांक व दिनांक | पुरविण्यात आलेल्या कामगारांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| | **एकूण -** | | |

**ब)आर्थिक वर्ष २०१८-१९ (दि.०१ एप्रिल २०१८ ते दि.३१ मार्च २०१९)**

| अ.नं. | ज्या आस्थापनेला कामगार पुरविण्यात आले त्या आस्थापनेचे नाव | आदेश क्रमांक व दिनांक | पुरविण्यात आलेल्या कामगारांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| | **एकूण -** | | |

**क)आर्थिक वर्ष २०१९-२० (दि.०१ एप्रिल २०१९ ते दि.३१ मार्च २०२०)**

| अ.नं. | ज्या आस्थापनेला कामगार पुरविण्यात आले त्या आस्थापनेचे नाव | आदेश क्रमांक व दिनांक | पुरविण्यात आलेल्या कामगारांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| | **एकूण -** | | |



Scanned by CamScanner

ड)मागील ३ वर्षात सरासरी पुरविलेल्या कामगारांची संख्या

| अ.नं. | आर्थीक वर्ष | आस्थापनेचे नाव | पुरविण्यात आलेल्या कामगारांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | २०१७-१८ | | |
| २ | २०१८-१९ | | |
| ३ | २०१९-२० | | |
| | | सरासरी - | |

आ) कागदपत्रे

| अ.नं. | निविदेसोबत सादर (अपलोड) करावयाचे कागदपत्रांचा तपशिल |
|---|---|
| १ | संस्था नोंदणीकृत असलेबाबत सक्षम प्राधीका-याने दिलेले प्रमाणपत्र. |
| २ | निविदा धारकाचे मागील तीन वर्षाचे सरासरी वार्षिक उलाढालीबाबत चार्टर्ड अकौन्टंट (CA) यांचे प्रमाणपत्र.(२०१७ ते २०१८, २०१८ ते २०१९ व २०१९ ते २०२० ) |
| ३ | आयकर पॅन कार्डची सत्यप्रत. |
| ४ | कामगार आयुक्त कार्यालयाकडील मागील ३ वर्षातील सर्व कामांचे लेबर लायसेन्सची सत्यप्रत. |
| ५ | PF Code Accounts Number रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राची सत्यप्रत. |
| ६ | प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सीज (रेग्युलेशन)ॲक्ट, २००५ व महाराष्ट्र प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सीज (रेग्युलेशन) रूल्स, २००७ चे तरतुदीस अनुसरून सिक्युरिटी कंत्राटी कामगारांचे पोलीस कमिशनर ऑफिस कंन्ट्रोलिंग ॲथॉरिटी यांचेकडील फॉर्म नं.VI मधील प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सी लायसेन्सची सत्यप्रत.(सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी आवश्यक) |
| ७ | व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत. |
| ८ | GST रजिष्ट्रेशनची सत्यप्रत. |
| ९ | बँक अकौन्ट खाते पास बुकची सत्यप्रत. |
| १० | यापुर्वी इतरत्र कामासाठी मिळालेले सुरक्षा गार्डबोर्ड एक्झमशन सर्टिफिकेटची सत्यप्रत. |

या तांत्रिक निविदांचे मुल्यांकन तांत्रिक निविदेत पात्र ठरणा-या निविदा धारकांचे मुल्यांकन पान नं. ०४ वरील मुद्दा क्र. ५ प्रमाणे केले जाईल.

**निविदाधारकाची सही व शिक्का**

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**



Scanned by CamScanner

# व्यावसायीक निविदा

दिनांक: - / /२०२१

प्रति,

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर

**विषय:- कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी, माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी व इतर कर्मचारी पुरविणेबाबतची ई-निविदा.**

**संदर्भ:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांचेकडील जाहिरात दैनिक ------------ दि. / /२०२१

**महोदय,**

उपरोक्त संदर्भाधीन जाहिरातीस अनुसरुन व निविदाबाबतच्या अटी-शर्ती पुर्ण वाचून, समजून घेऊन मी खालील सही करणार पुढीलप्रमाणे ई-निविदा सादर करीत आहे.

१) **निविदाधारकाचे/ठेकेदाराचे संपूर्ण नांव व पत्ता** : ------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

२) **फोन/मोबाईल नंबर** :

**ई-मेल आय डी.** :

३) **ठेकेदारीचे स्वरुप** :

(भागीदारी/प्रा.लि/पब्लीक लि.इ.)
भागीदारी असल्यास पार्टनरशीप डीड
ची प्रत, रजिस्ट्रेशन सर्टीफिकीट इ.
तांत्रिक निविदे सोबत जोडावी.

४) **सध्या एजन्सीकडे पे रोलवर असलेल्या सुरक्षा कर्मचारी संख्येचा तपशील खालील प्रमाणे** :

अ) बंदुक चालविण्याचा परवाना असलेल्या (माजी सैनिक) सुरक्षा कर्मचा-यांची संख्या :

ब) माजी सैनिक सुरक्षा रक्षकांची संख्या :

क) इतर सुरक्षा कर्मचाऱ्यांची एकुण संख्या :

ड) एकूण सुरक्षा कर्मचारी संख्या (अ + ब + क) :

५) **इंडस्ट्रियल सिक्युरिटी ट्रेनिंग देणेची सुविधा आहे काय? (असल्यास ट्रेनिंग सर्टिफिकीट सोबत जोडावे):** :



Scanned by CamScanner

६) अ) सद्या कोणकोणत्या ठिकाणी सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरवितात त्या संस्थेची नांव, पत्ता, फोन नंबर सह यादी व संस्था निहाय सुरक्षा कर्मचारी संख्येचा तपशिल देणेत यावा. तसेच सोबत नेमणूक पत्रांची सत्यप्रत व यादी जोडावी.

ब) सध्या पुरविणेत येणा-या कंत्राटी कामगारांची एकुण संख्या :

७) **कंत्राटी सुरक्षा कामाचा पुर्वानुभव = एकुण ' वर्षे**

८) **सध्याचे सुरक्षा कंत्राटी कामगारांचे प्रतिदिनी (Per Day) वेतन दर**

| अ.नं. | तपशील | मुळवेतन (रुपये/पैसे) | स्पेशल अलाऊन्स (रुपये/पैसे) | एकूण (रुपये/पैसे) |
|---|---|---|---|---|
| १ | **सुरक्षा अधिकारी** (माजी सैनिक) | ५२५.९० | ४२.०० | ५६७.९० |
| २ | **सुरक्षा सुपरवायझर** (माजी सैनिक) | ४३०.२३ | ४२.०० | ४७२.२३ |
| ३ | **सशस्त्र सुरक्षा रक्षक** (माजी सैनिक) | ४११.९० | ४२.०० | ४५३.९० |
| ४ | **सुरक्षा रक्षक** (माजी सैनिक) | ३५९.६७ | ४२.०० | ४०१.६७ |
| ५ | **सुरक्षा रक्षक** (सिव्हीलीयन) | ३३९.५४ | ४२.०० | ३८१.५४ |
| ६ | **अकुशल कामगार व सुरक्षारक्षक** (मुंबई/चेन्नई कार्या.झोन नं.१) | ३८५.४२ | ४२.०० | ४२७.४२ |

**टिप-** संस्थान आस्थापनेस शॉप्स अॅन्ड कमर्शियल इस्टॅब्लिसमेन्ट (झोन) परिमंडल नं.३ मुंबई, बैंगलोर, चेन्नई व हैद्राबाद करीता परिमंडल नं.१ नुसार किमान वेतनदर लागु आहेत. सध्याचे वेतनदर अथवा किमान वेतनदरापेक्षा कमी दरांचा विचार केला जाणार नाही. वरील दरांमध्ये प्राव्हीडंन्ड फंड, सर्व्हीस टॅक्स, जी.एस.टी, सानुग्रह अनुदान, ग्रुप इन्शुरन्स इत्यादी बाबींचा समावेश करणेत आलेला नाही. वरील प्रमाणे रक्कम संस्थानकडून संबधीत कंत्राटदारास कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करणेकामी देणेत येईल.

०९) **अ) प्रॉव्हीडंट फंड प्रशासकीय चार्जेससह** : मागणी- १३.०० %
(मालकाचा हिस्सा) (१३.०० %)

**ब) CGST - ९ % व SGST – ९ %** : अशी एकूण GST = १८ %

**क) सानुग्रह अनुदान (८.३३ %)** : मागणी- ८.३३ %

उपरोक्त नमूद केलेप्रमाणे रक्कम संस्थानकडून कंत्राटदारास देणेत येईल. निविदेचा भाग म्हणून निविदेतील प्रत्येक पानांवर नमूद केलेल्या अटी शर्ती मान्य असलेबाबत प्रत्येक पान सहीशिक्यानिशी स्वःसाक्षांकित करुन दयावेत.

निविदेतील सर्व अटी व शर्ती वाचल्या असून, त्यानुसार कंत्राटदारावर येणाऱ्या सर्व कायदेशीर आर्थिक जबाबदाऱ्या विचारात घेऊन,आमचेमार्फत सदर व्यवसायीक निविदा सादर करण्यात येत आहे.



Scanned by CamScanner

खालील सही करणार मी / आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण संस्थानचे संकेतस्थळ व महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली ई-निविदा वाचली. आपल्या ई-निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी / आम्ही वाचल्या असून मला / आम्हाला मान्य आहेत. आपले अटी शर्तीचे पालन करावयाचे मी / आम्ही मान्य करीत आहे / आहेत.

मी / आम्ही आपणास ई-निविदेमध्ये नमूद केलेली सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी संख्या तसेच वेळोवेळी आवश्यकतेनुसार मागणी प्रमाणे सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी संख्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी यांना कंत्राटी पध्दतीने पुरविणे बाबतची हमी देतो. अटी व शर्तीनुसार सुरक्षा कर्मचारी पुरविण्याची कामे नेमूण दिल्याप्रमाणे व्यवस्थित करुन दिले जाईल. त्यात कुठलेही प्रकारची फसवणूक व हलगर्जीपणा करणार नाही. तसेच संस्थानचे मागणी नुसार उत्सव अथवा साई भक्तांचे गर्दीचे काळात कोणत्याही वेळेस आवश्यकतेप्रमाणे सुरक्षा कर्मचारी पुरविणे बाबतची पुर्तता करुण देण्याची हमी आम्ही देत आहे / आहोत.

सुरक्षा कर्मचारी पुरविणेचे कॉन्ट्रॅक्ट प्राप्त झालेनंतर कामाची हमी म्हणुन एकूण रु.५५,२५,०००/- (अक्षरी रुपये पंचावन्न लाख पंचवीस हजार मात्र) सुरक्षा अनामत रक्कम (बिनव्याजी) निविदा मंजूर झाल्याचे कळविल्यापासून ०५ दिवसाचे आत मी / आम्ही संस्थानचे लेखाशाखा विभागात रोख भरणाण्याची हमी देत आहे / आहोत.

आपला / आपली विश्वासू,

एजन्सीचा शिक्का:-

(निविदाधारकाची सही व नांव)

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## Finanacial Bid "Bill of Quantity"

| | |
|---|---|
| **Under inviting Authority** | :- SHRI SAIBABA SANSTAN TRUST,SHIRDI |
| **Nature of work** | :- Supply of Security Gaurds & Security Personnels to all Sansthans Departments. |
| **Tender No.** | :- SHRI SAIBABA SANSTAN TRUST,SHIRDI |
| **Bidder Name** | |

| **Sr.No** | **Description** | **Rate in Percentage of Only Service Charges to be entered by the Bidder** | |
|---|---|---|---|
| | | Percentage in Figures | Percentage in Words |
| 1 | Service Charges (in Percentage) for Supply of Security Guards (ladies/Gents), Security Guards (Ex Servicemen), Security Supervisors, Security Gun men's, Security Officers, Gym Trainer, employees as mentioned on page no 10 of tender document (Excluding PF, GST, Group Insurance, Ex-gratia, etc.) | | |

(निवीदा फॉर्ममधील अटी व शर्तीचे अ.नं.३३ (अ) मध्ये नमुद केलेल्या सर्व कायदेशीर आर्थिक देणी (बाबी) व जबाबदाऱ्या विचारात घेऊन, निविदाधारकांनी सर्व्हिस चार्जेसची टक्केवारी नमूद करावी.)

(Note- ""If a firm quotes 'Nil' charges /consideration, the bid shall be treated as unresponsive and will not be considerd " )

निविदाधारकाचे नांव

(एजन्सीचा शिक्का व स्वाक्षरी)



Scanned by CamScanner